ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १७ पुणें, बुधवार तारीख २२ ऑगस्ट, १९५१ अंक ३४

## विविध माहिती

**भारतीय योगी सिनेमांत काम करणार**—नवी दिल्ली येथील योगी श्री. राव हे एका रशिअन चित्रपटांत रॅसपुटिन ह्या इतिहास प्रसिद्ध धर्मगुरूची भूमिका करणार आहेत असें समजतें. आपल्या योगिक सामर्थ्याची कसोटी म्हणून नीस ( इटली ) येथें अग्नीवरून चालण्याचा प्रयोग ते करून दाखविणार आहेत. श्री. राव हे भविष्यकथनहि करतात. १९५२ च्या ऑक्टोबरमध्यें तिसरें जागतिक महायुद्ध सुरू होईल, असें भविष्य त्यांनीं वर्तविलें आहे.

**हबीब बँकेची सीलोनमध्यें शाखा**—पाकिस्तानच्या हबीब बँकेला सीलोनमध्यें शाखा काढण्याची परवानगी सीलोनच्या सरकारनें दिली आहे, असें समजतें.

**अमेरिकेंतील विमानांची संख्या**—अमेरिकेंत नागरी वहातूक करणारीं ९२,००० विमानें आहेत व पायलटांची संख्या ५,५०,००० इतकी आहे. १९५० मध्यें अमेरिकन विमानांनीं एकूण १ कोटी, ८० लाख प्रवाशांची ने-आण केली. त्यापैकीं १ कोटी, ६२ लाख प्रवासी अमेरिकेंतल्या अमेरिकेंतच प्रवास करणारे होते.

**ब्रिटनचा मांसाचा पुरवठा**—ब्रिटन आणि अर्जेंटायना ह्या दोन देशांत जो व्यापारी करार झाला आहे, त्यामुळें ब्रिटनला अर्जेंटायनाकडून अधिक प्रमाणांत मांसाचा पुरवठा करण्यांत येणार आहे. अर्जेंटायना हा मांसाची निर्यात करणाऱ्या देशांत पहिल्या क्रमांकाचा देश आहे. तथापि, मांसाच्या एकूण निर्यातींत वाढ होण्याची शक्यता नसल्यामुळें अमेरिकेला व इतर कांहीं देशांना अर्जेंटायना कमी प्रमाणांत मांस पुरविणार असल्याचें समजतें.

**कलाविषयक शाळांना मदत**—बिहार राज्यांतील संगीत, नाट्य व नृत्य शाळांना मदत म्हणून दरवर्षी ५,१०० रुपये देण्याचें बिहारच्या सरकारनें ठरविलें आहे. त्याशिवाय, भारतीय प्रजासत्ताक दिनीं होणाऱ्या जलशासाठी २,५०० रुपयांची रक्कम मंजूर करण्यांत आली आहे.

**जपानशीं करावयाचा तह**—जपानशीं करावयाच्या तहाचा जो मसुदा अमेरिकेतर्फे मान्य करण्यांत आला आहे, त्यावर सह्या करण्यासाठीं सॅनफ्रॅन्सिस्को येथें ४ सप्टेंबरला परिषद बोलावण्यांत आली आहे. ह्या तहाच्या मसुद्याला रशिआ, भारत, ब्रह्मदेश, इत्यादि पौर्वात्य राष्ट्रांचा विरोध आहे. तरी पण रशिआनें परिषदेचें आमंत्रण स्वीकारलें आहे.

**इंग्लंड-इराक यांच्यामधील तेलाचा करार**—इराणमधील तेल पुरवठ्याचा प्रश्न उपस्थित झाल्यापासून मध्यपूर्वेतील तेल पुरवठा करणाऱ्या सर्व देशांत खळबळ माजून राहिली आहे. ब्रिटन इतर पुरवठा केंद्राकडून आपलें तेल वाढविण्याची खटपट करीत आहे. ह्या प्रयत्नांपैकीं इराकमधील तेलाचा पुरवठा वाढविणें हा एक आहे. आतां इराक व इंग्लंड ह्यांच्या दरम्यान नवा करार करण्यांत आला आहे.

**काश्मीरच्या महाराजांचा तनखा**—काश्मीरच्या महाराजांना सालीना १५ लाख रुपये तनखा देण्यांत येणार आहे. ह्या रकमेपैकीं ६ लाख रुपये काश्मीर सरकार देणार असून उरलेले ९ लाख रुपये सध्या भारतीय सरकार देणार आहे. ' काश्मीरला मदत ' ह्या खात्याखालीं ही रक्कम देण्यांत यावयाची असून ती कर्ज म्हणून मानली जाणार आहे.

**इराणच्या राजपुत्रावरील फिर्याद काढून टाकली**—इराणच्या शहाचे धाकटे बंधू प्रिन्स महंमद पेहलवी हे सध्या मिचिगन (अमेरिका) येथें शिक्षण घेत आहेत. परवान्याशिवाय मोटार चालविण्याबद्दल त्यांच्यावर खटला भरण्यांत आला होता. परंतु इराणमधील सध्यांचा " नाजूक परिस्थिति " लक्षांत घेतां तो काढून घेण्यांत यावा अशी विनंती फिर्यादीच्या वकिलांनीं केली. त्या प्रमाणें कोर्टानें खटला काढून टाकला. प्रिन्स महंमद ह्यांचें वय २५ वर्षांचें आहे.

**कोरिअन युद्धाचा खर्च**—कोरिआंतील युद्धाप्रीत्यर्थ अमेरिकेला आतापर्यंत ५०० कोटी डॉलर्स खर्च आला आणि जून १९५२ पर्यंत आणखी तितकाच खर्च येईल असा अंदाज करण्यांत आला आहे. अमेरिकेच्या प्रतिनिधीगृहापुढें पुढील जून, पर्यंतच्या लष्करी खर्चाच्या रकमेची तरतूद करणाऱ्या बिलावर चर्चा चालू असतां एका सभासदानें वरील आंकडा सांगितला.

**सरसेनापतीचा कारखानदार झाला**—भारताचे माजी सरसेनापती सर क्लॉड ऑचिन्लेक ह्यांनीं पाकिस्तानांत गालिच्यांचा कारखाना काढण्याचें ठरविल्याच्या वार्ता होत्या. आतां त्यांना खुद्द पाकिस्तान सरकारनेंच पाठिंबा दिला आहे. गालिच्यांना लागणारा लोकरीचा धागा यंत्राच्या साहाय्यानेंच विणण्यांत येणार आहे. यंत्रसामुग्री मिळविण्याचे प्रयत्न चालू असून १९५२ सालअखेर उत्पादनास सुरवात होईल असें समजतें. सर सेनापतींच्या कंपनीच्या शाखा मुलतान, लाहोर, इत्यादि शहरांतून निघणार आहेत.

**अमेरिकन कारखानदारांचा नफा वाढला**—अमेरिकेंत सध्या उत्पादनाचा खर्च आणि कर ह्या दोन्हींत खूप वाढ झाली आहे. तरी सुद्धा तीन प्रमुख उद्योगधंदे सोडून उरलेल्या २५ महत्त्वाच्या उद्योगधंद्यांना युद्धपूर्व १९४० सालापेक्षां १९५० सालांत अधिक दरानें नफा पडला. २५ प्रमुख उद्योगधंद्यांपैकीं ६ सोडले तर उरलेल्यांना १९४९ सालापेक्षाहि १९५० सालीं अधिक नफा झाल्याचें आढळून आलें. ही माहिती अमेरिकेच्या फेडरल ट्रेड कमिशननें दिली आहे.

**रशिआचें पोलादाचें उत्पादन**—ब्रिटिश आयर्न अँन्ड स्टील फेडरेशननें रशिआंतील १९४९ सालच्या पोलादाच्या निर्मितीविषयीं आपला अंदाज व्यक्त केला आहे. ह्या अंदाजाप्रमाणें त्या सालीं रशिआंत सर्वांत जास्त म्हणजे २,३२,२०,००० टन पोलाद उत्पन्न करण्यांत आलें. त्याच वर्षी ब्रिटननें १,५५,५०,००० टन आणि अमेरिकेनें ६,९६,२०,००० टन पोलाद निर्माण केलें. हे दोन्ही आकडेहि जास्तींत जास्त उत्पादनाचेच आहेत.

**कृष्णा-पेन्नार धरणाची योजना**—कृष्णा-पेन्नार धरण-योजनेशीं संबंध असलेल्या राज्यांच्या मंत्र्यांची परिषद नुकतीच दिल्ली येथें भरली होती. ह्या परिषदेंत कृष्णेचें पाणी निरनिराळ्या राज्यांनीं कोणकोणत्या प्रमाणांत घ्यावें ह्यासंबंधीं निर्णय करण्यांत आला. ह्या निर्णयाप्रमाणें मद्रास राज्याला ४६॥ टक्के, हैद्राबादला २८ टक्के, मुंबई राज्याला २४ टक्के आणि म्हैसूरला १॥ टक्के ह्या प्रमाणांत पाणी मिळावयाचें आहे.

**गुजराथमध्यें रेल्वेचा नवा रस्ता**—काठेवाडमधील भावनगर आणि संबायतच्या आखाताजवळ असलेलें तारापूर ह्या शहरांना जोडणारा रेल्वेचा रस्ता बांधण्यांत यावा, असें मुंबई व सौराष्ट्र सरकारांनीं मध्यवर्ती सरकारला सुचविलें आहे. हा रेल्वेचा रस्ता बांधण्यांत आला तर मुंबई आणि भावनगर ह्या शहरांमधील अंतर सुमारें १२५ मैलांनीं कमी होईल. हा संकल्पित रस्ता धोलरा आणि आनंद ह्या गांवांतून जाणारा असून रुंद रुळाचा असेल.

**ताडगुळाचें उत्पादन**—ताडगुळाच्या उत्पादनांत मद्रास राज्य सर्वांत पुढें आहे असें समजतें. १९५१ च्या मे महिन्यांत सुमारें ५,४१८ मण ताडगूळ तयार झाला. भारतानें १९५१ सालीं आतांपर्यंत ९,७६००० टन तांदूळ आयात केला. अन्नधान्यांवर नियंत्रणें घातल्यापासून सर्वांत अधिक तांदूळ ह्या सालीं आयात करण्यांत आला. भारतांत दरवर्षी १ कोटी, २० लाख कळकाचें उत्पादन होतें. त्यापैकीं निम्मे शेतीच्या कामासाठीं वापरले जातात आणि बाकीचे घरें बांधणें, कागद तयार करणें, कुंपणें घालणें इत्यादि कामासाठीं वापरले जातात.

**जपाननें केलेल्या लुटीची विक्री**—गेल्या महायुद्धांत जपाननें ब्रह्मदेश व्यापला त्यावेळीं जपानी लष्करानें बरीच लूट गोळा केली होती. १९४५ सालीं ब्रह्मी सरकारनें ती परत मिळविली. ही लूट मुख्यतः रंगूनमधील बँकांतून नेण्यांत आली होती. ज्या वस्तूंची मालकी सिद्ध करण्यांत आली त्या त्यांच्या मालकांना परत करण्यांत आल्या. उरलेल्या लुटीच्या मालाची आतां विक्री करण्यांत येणार आहे. ह्या मालाची किंमत सुमारें ७,५०,००० पौंड आहे. मालांत सोनें, चांदी, जडजवाहीर, इत्यादि चिजा आहेत.

**क्रिकेट स्टेडिअमसाठीं कर्ज**—अहमदाबादच्या क्रिकेट क्लबनें स्टेडिअम बांधण्यासाठीं १० लाख रुपयांचीं डिबेंचर्स विक्रीस काढण्याचें ठरविलें आहे. स्टेडिअममध्यें एक क्लबची इमारत आणि पॅव्हिलिअनहि बांधण्यांत यावयाचें आहे. मध्यवर्ती सरकारची मंजुरी मिळतांच २ लाख रुपयांचीं डिबेंचर्स ताबडतोब विक्रीस काढण्यांत येतील.


स्थापना १९३६

**युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा**

[ शेड्यूल्ड बँक ]

*पॅलेस स्ट्रीट, सातारा.*

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.

ता. ३०-६-५१ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,४३,७६० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,६५,००० |
| ठेवी | रु. | ६७,१९,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ७९,००,००० |

मुदत ठेवींवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षे | तीन अगर अधिक वर्षे |
|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-१२-० | ३ रुपये |

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | ” | २-०-० |
| चालू डिपॉझिट | ” | ०-८-० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
वा. ग. चिरमुले, बी. ए., एलएल. बी., चेअरमन.



दि

**युनायटेड कमर्शिअल बँक लि.**

कलकत्ता.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | ८ कोटी रु. |
| खपलेलें भांडवल | ... | ४ कोटी रु. |
| वसूल भांडवल | ... | २ कोटी रु. |
| रिझर्व्ह फंड | ... | ६० लक्ष रु. |

: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :

जी. डी. बिर्ला ( चेअरमन )

| | |
|---|---|
| ईश्वरीप्रसाद गोएंका, व्हाइस चेअरमन | रमणलाल जी. सरय्या, व्हाइस चेअरमन |
| अनंत चरण लॉ | महादेव एल. डहाणूकर |
| बैजनाथ जालन | मदनमोहन आर. रुइया |
| गोविंदलाल बंगूर | मोहनलाल एल. शहा |
| पी. डी. हिमतसिंगका | मोतीलाल तापुरिया |
| रामेश्वरलाल नोपानी | नवीनचंद्र मफतलाल |

: जनरल मॅनेजर :

. टी. ठाकूर

भारत, बर्मा, पाकिस्तान आणि मलाया येथील महत्त्वाच्या शहरीं व गांवीं बँकेच्या शाखा असल्यानें आणि बँकेच्या सबंध जगभर एजन्सीच्या व्यवस्था असल्यानें भारतांत व भारताबाहेर अत्युत्कृष्ट बँकिंगची सेवा करण्यास बँक सुसज्ज आहे.

# अर्थ

बुधवार, ता. २२ ऑगस्ट, १९५१





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## भारत आणि ब्रिटन ह्यांच्यांतील व्यापार

लंडनमधील इंडिअन अँड ईस्टर्न न्यूज पेपर सोसायटीपुढें ब्रिटनचे परराष्ट्रिय व्यापाराचे सेक्रेटरी मि बॉटम्ले ह्यांनीं नुकतेंच एक भाषण केलें. भारत आणि ब्रिटन ह्या दोन देशांतील आर्थिक आणि व्यापारी संबंध कशा प्रकारचे आहेत ह्यासंबंधीं त्यांनीं आपल्या भाषणांत कांहीं विचार व्यक्त केले:

मि. बॉटम्ले म्हणाले कीं कित्येक वर्षेपर्यंत ब्रिटन भारताला सर्वांत अधिक माल पुरवीत आलें आह आणि उलटपक्षीं घेतहि आलें आहे. भारत ब्रिटनच्या निर्यातीपैकीं ४ टक्के निर्यात घेतो आणि ब्रिटनच्या आयातीपैकीं ४ टक्के माल पुरवितो.. तथापि ब्रिटनचे भारताशी असलेले संबंध येवढ्याच पुरते मर्यादित नाहींत. भारतामधील किती तरी व्यापारी आणि औद्योगिक संस्थांना ब्रिटिश व्यापाऱ्यांनीं भांडवल पुरविलें आहे आणि अशा तऱ्हेनें भारताच्या अर्थव्यवस्थेचा विकास करण्यास मदत केली आहे. १९४७ साली भारताला स्वतंत्र स्थान प्राप्त झालें. त्यानंतर भारताच्या उद्योगधंद्यांत जें नवें भांडवल गुंतविलें गेलें, त्यापैकीं सुद्धां बरेचसें भांडवल ब्रिटनकडून पुरविलें गेलें आहे. सध्यां भारताला आपली औद्योगिक प्रगति साधावयाची आहे. ह्या कामांत यंत्रसामुग्री आणि वहातुकीच्या मोटारी ह्यांची मोठ्या प्रमाणावर गरज लागेल. त्यांचा पुरवठाहि ब्रिटनकडून करण्यांत येत आहे. भारताला लागणाऱ्या रोजच्या वस्तूंचा पुरवठाही ब्रिटन करूं शकेल. परंतु सध्या भारताची परकीय हुंडणावळ ह्या प्रकारच्या मालासाठीं खर्च करणें योग्य ठरणार नाहीं. ती हुंडणावळ भांडवली मालासाठीं खर्च करणें अधिक इष्ट आहे आणि भारत तसेंच करीत आहे. भारताकडून ब्रिटनला चामडी, कातडीं, मँगेनीज, कॉटन वेस्ट व तागाच्या वस्तू अधिक प्रमाणांत मिळाल्या तर हव्या आहेत. परंतु डॉलरच्या कक्षेंतील देशांकडूनहि ह्याच मालाला मागणी येत असल्यामुळें भारताला आपल्या निर्यातीच्या मालापैकीं कांहीं मालावर नियंत्रण ठेवणें भाग पडलें आहे. उलटपक्षीं, भारताला ब्रिटनकडून जितकें लोखंड, पोलाद व टिन पाहिजे आहे तितकें ब्रिटन पुरवूं शकत नाहीं हेंहि खरें आहे. परंतु ह्या मर्यादा अनिवार्य अशा आहेत.

## राहत्या घरांचा प्रश्न : आग्नेय आशियांतील गत

आग्नेय आशियांतील लोकांच्या रहाण्याच्या सोईसंबंधीं संयुक्त राष्ट्रांच्या ट्रॉपिकल हौसिंग मिशननें एक अहवाल नुकताच प्रसिद्ध केला आहे. त्याप्रमाणें, ह्या विभागांतील अन्नविषयक प्रश्नाचे खालोखाल ह्याच प्रश्न अत्यंत महत्त्वाचा व गंभीर असा आहे. एकेका खोलींत दोन किंवा त्यापेक्षा जास्त कुटुंबें राहातात, अशीं लक्षावधि उदाहरणें आहेत. युद्धामुळें पडझड झाली आहे किंवा वस्ती हलवावी लागली आहे, अशा मोठाल्या शहरांतून रहाण्याजोगीं घरें कमी पण गरज वाढलेली, अशी स्थिति निर्माण झाली आहे. भारतांत आणि पाकिस्तानांत घरांचा भयंकर तुटवडा असून लोकांना निवाऱ्याची जागा व पोटाला व्यवसाय मिळवून देणें अशक्यप्राय झालें आहे, आणि त्या देशांच्या सरकारांवर त्याचा फार मोठा आर्थिक ताण पडत आहे. ६० लक्ष निर्वासितांना निवाऱ्याची जागा पाहिजे, ती लक्षांत घेतली नाहीं, तरी भारताच्या शहरी लोकसंख्येंत दहा वर्षांत ६६% वाढ झाली आहे आणि घरांची तरतूद २०% नेंहि वाढलेली नाहीं. १९४१ च्या रहाणीचा दर्जा टिकवावयाचा म्हटलें तरी ९० लक्ष लोकांसाठी नवीं घरें बांधून झालीं पाहिजेत, एवढा तो बिकट प्रश्न आहे. गेल्या २० वर्षांत सिंगापूरमधील वस्ती दुप्पट झाली, परंतु युद्धकाळांत नव्या घरांची भर पडूं शकलेली नाहीं. मनिलामधील ८०% इमारती युद्धकाळांत नष्ट किंवा निरुपयोगी झाल्या, त्यांपकीं निम्मीं तरी रहाण्याचीं घरें होतीं. परंतु इकडे त्या काळांत मनिलाची लोकसंख्या ८ लाखांवरून १२ लाखांवर गेली ! सबंद आग्नेय आशियांतच लोकसंख्येच्या वाढीचा आणि निवाऱ्याच्या जागेचा गंभीर प्रश्न उपस्थित झालेला आहे. चालू मिळकतींतून चालू खर्चंच भागत नाहीं, अशी खासगी संसारी माणसाची स्थिति झाली आहे तशीच ती राष्ट्रीय संसारांचीहि पण झालेली आहे. तेव्हां संसारी माणसाला जुनें कर्ज जसें फेडता येत नाहीं व कुटुंबाची पुढची तरतूदहि करतां येत नाहीं, तद्वतच राष्ट्रांच्या आर्थिक संसाराची गत आहे. आजच्या नागरिकांच्या गरजा भागविता येणेंच मुष्कील झालें आहे, तेथें लोकसंख्येच्या वाढीचा विचार न करणेंच शहाणपणाचें होऊं पहात आहे !

## शेतकरी कुटुंबांच्या आर्थिक परिस्थितीची पहाणी

स्वतःच्या मालकीची शेत-जमिन नसणाऱ्या पण शेतीवर राबणाऱ्या कुटुंबांच्या आर्थिक परिस्थितीची पाहणी भारतीय सरकारच्या मजूर खात्यानें केली आहे. ह्या पहाणीसाठी म्हैसूर संस्थानांतील एक खेडें निवडण्यांत आलें होतें, आणि जरूर ती माहिती १९४९ सालीं गोळा करण्यांत आली होती. पहाणींत असें आढळून आलें कीं शेत-जमीन नसणाऱ्या कुटुंबाचें सरासरी वार्षिक उत्पन्न सुमारें ४२१ रुपये होतें आणि खर्च ४७८ रुपये होतो. उत्पन्नापैकीं सुमारें २२८ रुपये उत्पन्न शेतावर काम करून मिळविलेले होते. एकूण उत्पन्नांशी मंजुरीच्या उत्पन्नाची टक्केवारी ५४·२ अशी पडते. कुटुंबांचें खाणेपिणें अपुरें आणि निसत्व आढळून आलें. ऋतुमानाप्रमाणें आहाराच्या प्रकारांतहि फेरफार झालेला दिसून आला. ज्या शेतकरी कुटुंबांना स्वतःच्या जमिनी होत्या त्यांचा सर्वांत जास्ती खर्च अन्नावर होतो. एकूण उत्पन्नाच्या ७१·१ टक्के खर्च अन्नावर आणि १६·२ टक्के कापडचोपड आणि पायवणे ह्यांच्यावर होतो. शेत-जमीन नसलेल्या कुटुंबांचे हेच आंकडे अनुक्रमें ७३·५ टक्के आणि १३·९ टक्के असे आहेत. जमीन असलेल्या २५ कुटुंबांची पहाणी करण्यांत आली. त्यापैकीं १९ कुटुंबांना कर्ज होतें. कर्जाची दर कुटुंबी सरासरी

१४५·२ रुपये पडली. सरासरी काढतांना कर्ज-असलेलीं कुटुंबेंच विचारांत घेतलीं होतीं. जमीन नसणाऱ्या ८ शेतकरी कुटुंबांचीही पहाणी करण्यांत आली. त्यापैकीं ६ कुटुंबांना कर्जें होतीं. कर्जांची सरासरी रु. ९६·७ इतकी पडली. भारतीय सरकारचें मजूर खातें शेतावर काम करणाऱ्या मजुरांच्या आर्थिक परिस्थितीची चौकशी सध्यां करीत आहे. ह्या चौकशीसाठीं भारताच्या निरनिराळ्या भागांतील एकूण १३ खेडीं निवडण्यांत आलीं आहेत. म्हैसूर संस्थानामधील ज्या खेड्याच्या पहाणीची हकीकत वर दिली आहे ते अशा खेड्यांपैकीं तिसरें खेडें आहे. पूर्व आशियांत सर्वच देशांतून शेतीवर जगणाऱ्या लोकांची संख्या अधिक आहे. भारतही त्याला अपवाद नाहीं. निकृष्ट शेतकरी हा राजकीय दृष्ट्या धोक्याचा ठरतो, हें चीनच्या उदाहरणावरून दिसून आलेंच आहे. तेव्हां त्यांच्या आर्थिक परिस्थितीवर उपाय करणें निकडीचें झालें आहे.

---

### ऑक्सफर्ड परिषदेस गेलेले प्रतिनिधी

जुलैअखेर ऑक्सफर्ड येथें भरलेल्या "कॉमनवेल्थ कॉन्फरन्स ऑन ॲग्रिकल्चरल कोऑपरेशन"ला मुंबई राज्यांतील खालील तीन बिनसरकारी गृहस्थ प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते:—(१) श्री. वाय. बी. गायतोंडे, मुंबई प्रां. सहकारी बँकेचे मॅनेजर, (२) शेतकरी सहकारी संघ, कोल्हापूरचे मॅ. डायरेक्टर श्री. तात्यासाहेब मोहिते व (३) बिग बागाइतदार को. सोसायटी, श्रीरामपूरचे, चेअरमन श्री. एस. एन. बोरावके.

---

### स्टुडिओ कामगारांची सहकारी सोसायटी

अंधेरी (बृहन्मुंबई)- येथील प्रकाश स्टुडिओमधील कामगारांनीं ऑक्टोबर, १९४९ मध्यें स्टुडिओ चालविण्यासाठी एक सहकारी सोसायटी स्थापन केली. प्रारंभींचें तिचें भांडवल १,४०० रु. होतें. एप्रिल, १९५१ मध्यें तिला १९ महिने पुरे झाले. ह्या मुदतींत सोसायटीनें ६½ लक्ष रुपयांची उलाढाल करून १२,००० रु. निव्वळ नफा मिळविला. सोसायटीनें कामगारांना ५,००० रु. व ३,००० रु. असा दोनदा बोनस दिला. बॉंबे टॉकीजच्या कामगारांनींहि एक 'सोसायटी—दि बॉंबे टॉकीज वर्कर्स इंडस्ट्रिअल को. सोसायटी लि.—स्थापन केली आहे. प्रत्येक पाळीसाठी सोसायटी बॉंबे टॉकीजला १५० रु. देते आणि आपल्यां कुळांकडून ७५० रु. घेते.

---

### अकौंटंट आजारी म्हणून रिपोर्टास विलंब

३१ ऑक्टोबर, १९४९ अखेर संपलेल्या वर्षी बॉंबे टॉकीज लि. ला १,४३,९७९ रु. तोटा झाला. त्यापूर्वीच्या वर्षीचा तोटा ३१,३२८ रु. होता. कंपनीचा चीफ अकौंटंट आजारीपणामुळें मुंबईबाहेर गेला आणि अपेक्षेइतक्या लवकर तो पुन: कामावर येऊं शकला नाहीं, त्यामुळें कंपनीच्या अहवालास इतका उशीर झाला असा खुलासा करण्यांत आला आहे.

---

### रिझर्व्ह बँकेच्या परदेशीय शिलका

रिझर्व्ह बँकेच्या बँकिंग विभागांत परदेशांतील शिलकांची रक्कम डिसेंबर, १९५० अखेर १९६ कोटी रु. होती ती जून, १९५१ अखेर १७ कोटी रुपयांनीं कमी होऊन १७९ कोटी रुपयांवर आली. बँकिंग विभागांतील स्टर्लिंग रोखे इश्यू विभागांत वर्ग होऊन त्यांचे तारणावर चलनी नोटा काढण्यांत आल्या.

## गेल्या वर्षांतील आर्थिक परिस्थितीचा आढावा

### रिझर्व्ह बँकेचा रिपोर्ट*

रिझर्व्ह बँकेचा १९५०-५१ चा 'करन्सी अँड फायनॅन्स' वरील अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. त्याचा पहिला भाग ३२ पृष्ठांचा असून त्यांत आंतरराष्ट्रीय आर्थिक घडामोडींचा आढावा घेण्यांत आला आहे. दुसरा भाग २४८ पृष्ठांचा असून त्यांत हिंदी आर्थिक घडामोडी तपशीलवार देण्यांत आल्या आहेत. प्रास्ताविक, उत्पादन आणि किंमती, पैशाचा पुरवठा, बँकिंग व भांडवल बाजार, सरकारी उत्पन्न-खर्च, परराष्ट्रीय देणीं-घेणीं व परराष्ट्रीय व्यापार, हुंडणावळीवराल नियंत्रण, सोनें-चांदी, इत्यादि विषयक चर्चा, तुलनात्मक आकडे, कोष्टकें, तक्ते, ग्राफ, इत्यादींच्या सहाय्यानें करण्यांत आली आहे.

१९५०-५१ मधील सर्वांत महत्त्वाची जागतिक आर्थिक घडामोड, म्हणजे कोरियन युद्धानें चलनवाढ, मालाची साठेबाजी, युद्धतयारी, इत्यादींस दिलेली प्रचंड चालना ही होय. १९५० मध्यें किंमतीचें मान अमेरिकेंत १६%, कॅनडांत १४%, ग्रेट ब्रिटनमध्यें २१%, जपानमध्यें २८% आणि भारतांत ८% वाढलें. किंमत वाढ रोखणें, हेंच सर्व देशांचें प्रमुख आर्थिक धोरण होऊन बसलें. इतर देशांना भेडसावणारा डॉलर्सच्या तुटवड्याचा प्रश्न पुष्कळच आटोक्यांत आला आणि युद्धोत्तर काळांत प्रथमच अमेरिकेंतून सोन्याची निर्गत झाली. १९५० सालीं जागतिक औद्योगिक उत्पादन १४% नें वाढलें परंतु शेतीचें व कच्च्या मालाचें उत्पादन घटून औद्योगिक उत्पादन चालू ठेवण्यासाठीं शिलकी साठे उपयोगांत आणावे लागले. पुनर्घटना व वाढ यांसाठीं आंतरराष्ट्रीय व राष्ट्रांच्या सरकारांनीं उपलब्ध केलेली एकूण रक्कम १९५० मध्यें १९४९ च्या मानानें घटलेलीच आढळते.

भारतांतील आर्थिक परिस्थिति मोठ्या ताणाचीच होती. नैसर्गिक आपत्ति, हिंद-पाकिस्तान व्यापारी तेढ, आवश्यक मालाचा, विशेषत: कपाशीचा व तागाचा तुटवडा, इत्यादि गोष्टी भारताला भोगाव्या लागल्या. कच्च्या मालाचा तुटवडा असूनहि औद्योगिक उत्पादन १९४९ चें इतकेंच जवळ जवळ राहिलें. एप्रिल १९५० ते मार्च १९५१ ह्या मुदतींत किंमतींत ११·८% वाढ होऊन इंडेक्स नंबर ३९२·४ वरून ४३८·६ वर गेला. रिझर्व्ह बँकेच्या परदेशीय शिलका ३८ कोटींनीं वाढल्यामुळें अंतर्गत पैशाच्या पुरवठ्यांत मोठी भर पडली. बँकांकडेहि कर्जांची प्रचंड मागणी होती आणि जनतेजवळील खेळता पैसा ९९ कोटी रुपयांनीं वाढला. त्यापूर्वीच्या दोन वर्षी त्यांत ५२ कोटींची घट पडली होती. शेड्यूल्ड बँकांनीं दिलेल्या कर्जांची रक्कम ८५ कोटी रुपयांनीं वाढली, म्हणजे त्यांच्या ठेवींपैकीं ६०% रक्कम त्यांनीं कर्जांत गुंतविली. त्यापूर्वीच्या वर्षी हें प्रमाण ५४% होतें. सरकारी व बिन-सरकारी रोख्यांच्या किंमतीचा इंडेक्स १००·९ वरून ९८·६ वर उतरला, ह्यावरूनहि भांडवलाच्या चणचणीवर प्रकाश पडतो. औद्योगिक कंपन्यांचे शेअर्स मात्र जागतिक परिस्थितीचा परिणाम म्हणून ८% नें सुधारले. मध्यवर्ती सरकारची उत्पन्नखर्चाची परिस्थिति समाधानकारक राहिली, हें त्याच्या रिझर्व्ह बँकेंतील शिलकांमधील वाढीवरून दिसून येतें.

---

*रिपोर्ट ऑन करन्सी अँड फायनॅन्स फॉर दि इअर १९५०-५१, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया. किंमत ५ रु.

## आमचें आज कोठें नडतें आहे?

### जर्मनीचा कित्ता : कामास जुंपून घेण्याचें अगत्य

( श्री. शंकरराव किर्लोस्कर )

चार वर्षांपूर्वी जर्मनींतील देखावा म्हणजे हजारों बाँबनीं उध्वस्त झालेला एक विस्तीर्ण प्रदेश, घरादारांची राखरांगोळी होऊन सारा मुलूख बेचिराख झालेला. एकहि कारखाना धडजागेवर नाहीं. कारण, बाँबचा जो मारा व्हावयाचा, तो कारखान्यावर नेम धरून. अशा कारखान्यांतून मोडतोड झालेलीं जीं यंत्रें शिल्लक होतीं, तींहि विजयी राष्ट्रांनीं लांबविलेलीं. त्याच राष्ट्रांनीं जर्मनीचे तीनतेरा वाजविले. पण या पराभूत आणि परतंत्र जर्मन जनतेनें गेल्या अवघ्या चार वर्षांत विलक्षण चमत्कार करून दाखविला आहे. सर्वत्र डागडुजी आणि साफसफाई, झपाट्यानें करून एकण एक कारखान्यांची पूर्ववत् उभारणी करण्यांत आली आहे. या कारखान्यांतून साध्या पेन्सिलीपासून मोटारगाड्यांपर्यंत नाना तऱ्हेचा माल तयार होत असून, पहावें तिकडे लोक कामांत निमग्न आहेत. पूर्वी अवघ्या दोन बटाट्यांवर रोजी गुजराण करण्याचा प्रसंग आल्यानें, तेथील लोकांचीं गालफडें बसून गेलेलीं व चेहरे भकास झालेले दिसत. पण आज हे लोक पोटभर सुग्रास अन्न खात आहेत, इतकेंच नव्हे तर, परदेशीं धान्य पाठविण्याची सुद्धां त्यांनीं तयारी चालविली आहे. त्याशिवाय परदेशचा पैसा मिळणार नाहीं, याची प्रत्येकाला जाणिव आहे. ते लोक दररोज ११ तास काम करितात. तसें केल्याखेरीज गत्यंतर नाहीं, हें या जर्मनांनीं ओळखलें आहे. ते म्हणतात, आम्हांला स्वतःच्या पोटासाठी असें दीर्घ काळ काम तर केलें पाहिजेच, पण देशासाठीहि असा उद्योग केल्याशिवाय आम्हांला गत्यंतर नाहीं. कारण, जर्मनीचा माल अधिक चांगला, टिकाऊ, स्वस्त असा निघाल्याखेरीज इतर देशांतील कारखानदारांशीं टक्कर देतां येणार नाहीं, व स्वतःच्या देशाला डोकेंहि वर काढतां येणार नाहीं. तिकडील प्रत्येकजण ही गोष्ट ओळखून आहे. जुने कारखाने व जुनीं यंत्रें गेलीं, म्हणून ते हातपाय जोडून हळहळत बसले नाहींत, तर पहिल्यापेक्षां अधिक सुधारलेलीं यंत्रें बनवून सर्व प्रकारच्या साधनसामग्रीची त्यांनीं लयलूट केली आहे. या कारखान्यांतून तयार होणाऱ्या अद्यावत नमुन्यांच्या मशीनटूल्सचें हॅनोव्हर येथें भव्य व टोलेजंग प्रदर्शन परदेशीय पाहुण्यांना थक्क करून सोडणारें होतें.

आपण नाहीं कां अशा प्रकारची कामगिरी करूं शकणार ? बाँबवर्षावामुळें: जर्मनीची जी गत झाली होती, तीच ब्रिटिशांच्या दीडशें वर्षांच्या शोषणामुळें आपल्या देशाची झाली आहे. पण ते लोक स्वतः कंबर बांधून आपल्या देशाची पुनर्रचना करितात, तर तीच अद्‌भुत कामगिरी आपल्याला कां करितां येऊं नये? जर्मन लोकांप्रमाणेंच आपल्याला हात, पाय, आणि डोकीं आहेत ना? एवढेंच नव्हे तर आपल्या पूर्वजांनीं अशीं टोलेजंग कामें करून साऱ्या जगाला एके काळीं दिपवून टाकलें होतेंहि. मग आमचें आज कोठें नडतें आहे?

हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळाल्यानें जगांतील एक प्रचंड राष्ट्र म्हणून हा देश पुढें आला असला तरी पुढारलेल्या देशांतील माणसांची दृष्टि जशी विशाल आहे, तशी ती आपली नाहीं. आपलें कोठें चुकत असेल तर तें याच बाबतींत, असें मला वाटतें. कोणत्याहि प्रश्नाबद्दल आपण विचार करूं लागतों, तेव्हां आपलें


कूळ व शेतजमीन कायदा

आवृत्ति २ री, किं. ४ रु. कूळ कायदा, १९२९ आवृत्ति ३ री, किं. ३ रु. द्विभार्याप्रतिबंधक कायदा आवृत्ति ३ री, किं. १ रु. हिंदु घटस्फोट कायदा आजतागायतच्या दुरुस्त्यांसह व कानूंसह किं. १ रु., माढेंनियंत्रण कायदा किं. २ रु., मुंबई सावकारी कायदा आजतागायत किं. २॥ रु., तुकडेबंदी व जमीन एकत्रीकरण कायदा किं. २ रु., शेतकरी कर्जनिवारण कायदा अद्यावत् किं. ४॥ रु., खंडपावत्या पुस्तक किं. १० आणे.

Law Academy Bulletin Monthly : contains New & Amendment Acts, Rules, orders, etc. Annual subscription Re. one.

पत्ता—लॉ ॲकॅडेमी, २०४ सदाशिव, पुणें.

दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

ठेवी स्वीकारण्यांत येतात


ठेवीवर दर साल दर शेंकडा ७॥ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.

पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,

१७२, गिरगांव रोड, मुंबई ४

टेलिफोन २२७३८ तारेचा पत्ता : 'PEDNECO' Bombay




बँकेच्या दोन नवीन शाखा उमरावती व सांगली येथें लवकरच उघडणार आहेत.

घर, आपली जात, आपली गल्ली अथवा आपला प्रांत या पलीकडे आपली नजर पोहोचूं शकत नाहीं. बिहारमध्यें भूकंप झाला तर आपल्याला त्याचा धक्का बसत नाहीं, किंवा बंगालमध्यें दुष्काळ पडला, तर आपल्या पोटांत कालवाकालव होत नाहीं. एकदा देश अवाढव्य असला, म्हणजे कांहीं तोटे होतात ते असे. जपान, जर्मनी किंवा इंग्लंडसारख्या आटोपशीर देशांतील जनतेंत राष्ट्रीय भावनेचा विकास जसा स्वाभाविक व जलद होतो, तसें आपल्यासारख्या खंडप्राय देशांत होणें कठीण असतें. तथापि देश लहान असो अथवा मोठा असो, त्यांतील जनतेची आकुंचित दृष्टि बदलून तिला विशाल राष्ट्रीय दृष्टि प्राप्त झाल्याखेरीज त्या देशाचें पाऊल पुढें पडूं शकत नाहीं. ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्वच्छ आहे.

ही राष्ट्रीय दृष्टि कशी संपादन करावयाची. अथवा त्या प्रयत्नाला तरी कोठून सुरवात करावयाची? या प्रश्नाचें उत्तर तसें पाहिलें तर कठीण नाहीं. या प्रयत्नांची स्वतःपासून, आणि आपल्या रोजच्या कामापासून सुरवात झाली पाहिजे, हेंच त्याचें थोडक्यांत उत्तर.

नित्याचीं कामें आपल्या देशांत कशीं चाललीं आहेत, हें पाहूं गेल्यास खंत वाटल्याशिवाय रहात नाहीं. आज कोणत्याहि क्षेत्रांत पहा, तेथील कामें सुसूत्र अथवा हौसेनें चाललीं असल्याचें दिसून येत नाहीं. रस्ते झाडण्यापासून मोठमोठीं धरणें बांधण्यापर्यंत सर्व कामें अळंटळं करीत कशींबशीं चाललेलीं दिसतात. काम बरोबर होत नाहीं, ही प्रत्येकाची तक्रार. धोबी कपडे वेळेवर देत नाहीं, शिंपी कपडे नीट शिवत नाहीं, मास्तर मुलांना शिकवीत नाहीं, आगगाड्या वेळेवर येत नाहींत, पोलीस नीट बंदोबस्त ठेवीत नाहीं, अशी प्रत्येक कामाबद्दल तक्रार. सरकारविरुद्धहि अशाच तक्रारी. पण या वेळीं आपण क्षणभर तरी असा विचार करितो कां, कीं आपण स्वतः कांहीं काम करीत असतो, पण तें मनापासून आणि सत्वर करण्याकडे आपलें तरी कितीसें लक्ष असतें, आणि आपलें काम बरोबर न झाल्यानें, इतरांची खोटी अथवा नुकसान होतें, त्याची काय वाट. अशा धोरणामुळें कोणाचें काय साधत असेल, तें माहींत नाहीं. मात्र, एक गोष्ट निर्विवाद आहे कीं, साऱ्या देशांतील कामाची प्रत आणि प्रमाण यामुळें घटत चाललें आहे, व राष्ट्राचें पाऊल पुढें पडणें मुष्किलीचें होत आहे.

आपण हें पार विसरून गेल्यासारखें दिसतें कीं, कोणतेंहि काम उत्कृष्टपणें करण्यांत मोठा आनंद आहे. कोणतेंहि काम एक कलाच आहे. आपल्या चरितार्थाचेंच नव्हें, तर स्वतःचें व्यक्तिमत्व जगाला दाखविण्याचें तें एक मोठें साधन आहे. राष्ट्राची खरी सेवा करण्याची आपल्यास मिळालेली ती एक बहुमोल संधी आहे. भारत स्वतंत्र झाल्यानंतर आपल्यास शिकण्यासारखी कोणती गोष्ट असेल, तर ती हीच. यालाच मी राष्ट्रीय वृत्तीनें काम करण्याची धर्ती म्हणतो. एवढेंच नव्हे तर, लोकशाही टिकवून नव्या धर्तीवर समाजाची घडण करावयाची, तर त्या कार्यांची सुरवात देखील अशा लहान सहान कामांतून व रोजच्या व्यवसायांतूनच झाली पाहिजे.

इंग्रजांची सत्ता या देशांत असेपर्यंत जनतेचें दारिद्र्य दूर होण्याची आशा नव्हती. देशाला चांगले दिवस लाभणें दुरापास्त होतें. एवढ्यासाठी आपल्याला अगोदर राजकीय स्वातंत्र्य मिळविण्याकरितां वर्षानुवर्षें झगडावें लागलें. या राजकीय स्वातंत्र्यानेंच आपले अनेक राजकीय व सामाजिक प्रश्न सुलभतेनें सुटतील, असें सुखस्वप्न सर्वांच्या डोळ्यापुढें होतें. ती कल्पना मुळीच चुकीची नव्हती. पण त्यासाठी आपण सर्वांनीं स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं स्वतःची भूमिका पार पाडली पाहिजे. गोष्टी जरा दमानें घ्यायला शिकलें पाहिजे. रोम शहर एका दिवसांत बांधून झालें नाहीं, ही म्हण आपल्याला माहीत आहे.

परवा जर्मनीचे सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ डॉ. शाख्ट हे इंडोनेशियाचे वाटेवर असतांना कलकत्त्यास उतरले होते, त्या वेळीं त्यांनीं वार्ताहरांना सांगितलें कीं, हिंदुस्थानांत सर्व प्रकारची सामुग्री उपलब्ध नसल्यानें, व इकडे तज्ञांचाहि अभाव असल्यानें या देशाची आर्थिक सुधारणा आस्ते आस्ते होईल. ही परिस्थिति आपण लक्षांत घेऊन वागलों तर, आपल्यास निरुत्साही होण्याचें कारण नाहीं, किंवा वैफल्याच्या तडाख्यांत आपला तोल सुटण्याचेंहि कारण नाहीं. सुदैवानें आपल्या देशाच्या विकासासाठी आतां पंचवार्षिक योजना तयार झाली आहे. या योजनेमुळें राष्ट्राची सर्वांगीण सुधारणा घडवून आणतां येईल. पण ही कागदावरील योजना कृतींत आणून ती यशस्वी करणें, हें सरकारपेक्षां जनतेचें काम आहे. यासाठीं आपण सर्वांनीं एका नव्या दृष्टीनें व हुरूपानें आपआपल्या कामास लागलें पाहिजे.

आपल्याला आजही एक गोष्ट करावयास हवी. जोंवर या देशांत ब्रिटिश राज्य होतें, तोंवर प्रत्येक बाबतींत सरकारला विरोध करून आपलीं बारीक सारीक दुखणींहि वेशीवर टांगावयाचीं, आणि त्यांचें खापर सरकारच्या माथीं फोडावयाचें, असें चालत असे. सरकारवर टीका केली कीं आपलें काम झालें, असाच समज त्या वेळीं होऊन बसला होता स्वातंत्र्य मिळाल्यानंतर तोच किता आपण गिरवीत बसलों आहों, ही मोठी चूक नव्हे काय? हें झालें, किंवा आणखी एकादें सरकार आलें, तरी स्वतःच्या बाळाला आई दूधभात भरवते, त्याप्रमाणें घर बसल्या जनतेच्या सर्व गरजा व अपेक्षा तें सरकार पुरवील हें कसें शक्य आहे? प्रत्येक गोष्टीकरितां सरकारच्या तोंडाकडे पहाण्याची संवय यासाठींच आपल्यास टाकली पाहिजे आणि स्वावलंबन व सहकार, यांच्या बळावर जितकीं कामें पार पाडतां येतील, तेवढीं पाडलीं पाहिजेत. हें एक व्रतच आपल्याला स्वीकारावयास हवें. अन्न, वस्त्र, घर, यांची सुबत्ता व इतर सुखसोई आपल्याला हव्या असतील, आणि दारिद्र्य कर्दमांतून आपल्याला लौकर बाहेर पडायचें असेल, तर सर्वांनीं कामाला जुंपून घेतलें पाहिजे. जर्मन लोक स्वतःला असें जुंपून घेत आहेत, हेंच त्यांच्या यशाचें मर्म नव्हे काय?

आज आपल्या राष्ट्राची महारथी कर्णासारखी अवस्था झाली आहे. भारतीय युद्धांत त्याच्या रथाचें चाक जमिनींत घुसलें तेव्हां एका हातानें तें वर काढीत असता, दुसऱ्या हातानें तो शत्रूचा प्रतिकार करीत राहिला. त्याचप्रमाणें दारिद्र्यांत रुतलेला आपला देश बाहेर काढण्याचा उद्योग करीत असताच, आपल्यावरील पाकिस्तानचा संभाव्य हल्ला परतविण्याच्या पवित्र्यांत आपल्यास खडें राहिलें पाहिजे. असा पराक्रम करावयाचा तर, प्रत्येकानें स्वतःच्या कामासंबंधींचें औदासिन्य व अनास्था दूर करून, खऱ्या अर्थानें कार्यकर्ते झालें पाहिजे, व सध्याचा आणीबाणीचा प्रसंग ओळखून पाकिस्तानचें आव्हान स्वीकारण्यास एकजात सर्व जणांनीं पंडित जवाहरलालांच्या पाठीशीं उभें राहिलें पाहिजे; आणि अशी हिंमत दाखविली पाहिजे कीं, त्या विराट शक्तीपुढें मुठी वळवणारे थंडे पडतील व स्वतःचीं मनभटें चावींत त्यांना स्वस्थ व्हावें लागेल! आजच्या घटनेला भारताचे पुत्र व कन्या म्हणवून घेणाऱ्या सर्वांचें यापेक्षां निराळें कर्तव्य नाहीं.

(हिंदी स्वातंत्र्याचा चौथा वाढदिवस समारंभ, किर्लोस्करवाडी)

## घरकाम करणाऱ्या नौकरांचा प्रामाणिकपणा

मुंबई, कलकत्ता ह्यासारख्या मोठ्या शहरांतून घरकाम करणाऱ्या नौकरांची संख्या बरीच असते. मुंबईच्या 'रामा' गड्यानें तर आतां वाङ्मयांत सुद्धां आपलें स्थान पटकावलें आहे. घरकाम करणाऱ्या नौकरांचे सुद्धा संघ निर्माण झालेले असून आपल्या मागण्या संघटित रीत्या करण्याचें आधुनिक तंत्रहि ते आतां शिकूं लागले आहेत. आधुनिक युग संघटनेचें असल्यामुळें हें साहजिकच आहे. पण ज्या शहरांतून असे संघ असतील त्यांनीं घरकाम करणाऱ्या नौकरांचा प्रामाणिकपणा आणि कार्यक्षमता इकडेहि लक्ष पुरविल्यास तें उपयुक्त ठरेल. कलकत्त्यामधील पोलीस खात्यानें घरकाम्यांच्या प्रामाणिकपणासंबंधीं कांहीं आंकडेवार माहिती प्रसिद्ध केली आहे. तीवरून ह्या नौकरवर्गाच्या प्रामाणिकपणांत बरीच घट झाल्याचें दिसून येते. घरांत होणाऱ्या चोऱ्यांचें प्रमाण वाढलेलें दिसून येतें. गेल्या वर्षी अशा चोऱ्यांची संख्या, जानेवारी ते जुलैपर्यंत ७८६ होती. ह्या वर्षी ह्याच कालांतील चोऱ्यांची संख्या ८७० इतकी वाढली आहे. ह्या नौकरांचा घरचा पत्ता आणि इतर माहिती लोकांनीं पोलिसांकडे द्यावी अशी विनंति डेप्युटी कमिशनर श्री. बी. सी. रे ह्यांनीं केली आहे.

कलकत्त्यामधील गुन्ह्यांची आंकडेवारी

| गुन्ह्यांचा प्रकार | जानेवारी ते | जुलैअखेर |
|---|---|---|
| | १९५० | १९५१ |
| चोऱ्या | १,२६२ | १,७०७ |
| दरोडे व लूट | ७५ | ६५ |
| खून | २४ | २६ |
| लहान मुलांच्या दागिन्यांच्या चोऱ्या | ६६ | ३५ |
| खिसे कापणें | ४४६ | ३८६ |
| सायकलींच्या चोऱ्या | ४६३ | ६२५ |
| मोटारीच्या सामानाच्या चोऱ्या | १२४ | ९४ |

**पाणीवाला महाराज तेल शोधणार**—भारतीय सरकारनें पाणीवाला महाराज ह्या नांवानें प्रसिद्ध असलेल्या एका योग्याला जमिनींत खोल असलेलें पाणी शोधण्यासाठी नोकरीवर ठेवलें आहे. आतां ह्या महाराजांना तेलाचा शोध करण्यासाठी आसाममध्यें पाठविण्यांत येणार आहे, असें समजतें. कोईमतूर भागांत कांहीं ठिकाणीं पाण्याचा दुष्काळ आहे. तेथेंहि ते पाण्याच्या शोधासाठी जाणार आहेत.

**कॉलिनोज दंतमंजनाची प्रसिद्धि**—कॉलिनोज दंतमंजनाचे कारखानदार आणि सिने-निर्माते मि. करदार ह्या दोघांनीं मिळून एक चित्रपट काढण्याचें ठरविलें आहे. ह्या चित्रपटांत काम करण्यासाठी सुंदर हास्य असणाऱ्या एका तरुणीची आणि एका तरुणाची त्यांना गरज आहे. तरुणीचें वय १६ व तरुणाचें २५ वर्षांचें असावें व त्यांना हिंदी सफाईनें बोलतां यावें अशी अपेक्षा आहे. त्यांनीं इतरत्र काम केलेलें असतां कामा नये. पसंत उमेदवारांना दोन वर्षे करदार-चित्रपटांत काम मिळेल.

**मांजरें गवत कां खातात ?**—मांजरें गवत खाऊन खाल्लेलें ओकून कां टाकतात ह्याविषयीं पुढील माहिती मिळते. अन्न म्हणून मांजरें गवत खात नाहींत. त्याचा उपयोग उलटी करून पोट साफ ठेवण्यासाठी तीं करतात. कांहीं लोक ह्यासाठीं ज्याप्रमाणें रेचकाचा उपयोग करतात, त्याचप्रमाणें आरोग्य राखण्याचा त्यांचा हा उपाय आहे.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि. (स्थापना १९१८)
शाखा : दरमहा १ रु. पासून १०० रुपयांपर्यंत हप्त्याची
१ दादर
२ माहीम बचत योजना. व्याज ३ ते ३½ टक्के.
३ बेळगांव हेड ऑफिस– गिरगांव, मुंबई.
४ पुणें—सोमवार पेठ, सारस्वत कॉलनी, पुणें.

## दि राजाराम मिशी अँड इंडस्ट्रीज लि., कोल्हापूर

### शेती कामास उत्साहपूर्वक प्रारंभ

ह्या कंपनीनें धान्योत्पादनास अल्प प्रमाणांत सुरवात म्हणून पट्टणकोडोली येथें नदीकाठचें २५ एकर रान लांब मुदतीच्या करारानें घेतलें आहे. त्यांत भातपीक करून तें सरकारांत लेव्ही म्हणून घातलें. नदीचें पाणी रानांत आणण्यासाठीं कंपनीनें स्वतःच्या मालकीचें इंजिन व पंप सेट आणि सुमारें २,००० फूट लांबीची पोगर लाईन तयार करून घेतली आहे. ह्या शेतीविभागांतील गूळ व इतर उत्पादन कंपनीच्या शेअर होल्डर्सच्या कौटुंबिक आवश्यकतेनुसार अत्यंत सवलतीच्या दरानें देण्याचा इरादा आहे. वहातुकीचें काम स्वावलंबनानें करतां यावें ह्यासाठी कंपनीनें एक मोटार ट्रक घेतला असून त्याचेच जोडीला शेतकामाचीं ट्रॅक्टरसारखीं यांत्रिक साधनें घेण्याच्या योजना डायरेक्टर बोर्ड आंखीत आहे. शेअर होल्डरांना कर्जे देण्याचें काम रिझर्व्ह बँकेच्या सूचनेनुसार बंद करावें लागलें, त्याचा कंपनीच्या उत्पन्नावर परिणाम झाला तरी, मॅनेजिंग एजंटांनीं शेतीविभागास प्रारंभ करून त्यास मूर्तस्वरूप आणलें आणि १९५० चा त्यांचा मेहेनतानाहि न घेण्याचें ठरविलें. त्यामुळें कंपनीस ३१-१२-५० अखेर, २३१५ रु. नफा होऊन शेअर होल्डरांना शे. ४ रु. ६ आ. प्रमाणें डिव्हिडंड देतां आलें. कंपनीच्या ताळेबंदाप्रमाणें तिचें ३३,९७२ रु. वसूल भांडवल असून १,१०,५४५ रु. च्या ठेवी तिचेकडे आहेत आणि १,१४,१२६ रु. चीं कर्जे दिलेलीं आहेत. रोख हातांत व बँकांत ३५,६०२ रु. शिल्लक आहेत. कंपनीची ४ थी वार्षिक सभा ४ ऑगस्ट रोजीं झाली. मोठ्या प्रमाणावर आणि तज्ज्ञांच्या नेतृत्वाखालीं शेती करण्याचे कार्मी कंपनीस आम्हीं सुयश चिंतितों. (चेअरमन : श्री. केशवराव मोहिते, मॅनेजिंग एजंटस : मेसर्स राजाराम एजन्सीज.)

### मुलांच्या करमणुकीसाठी खास चित्रपट–संस्था

मुलांची करमणूक करणारे चित्रपट काढण्यासाठी एक स्वतंत्र संस्था ब्रिटनमध्यें काढण्यांत येणार आहे. ह्या संस्थेचें नांव 'चिल्ड्रेन्स फिल्म फौंडेशन लिमिटेड' असें राहील. संस्थेतर्फे करमणूक करणारे चित्रपट तर तयार करण्यांत येणार आहेतच, परंतु त्यांच्या वितरणाची आणि ते दाखविण्याचीहि व्यवस्था करण्यांत येणार आहे. ह्या संस्थेचें काम ब्रिटनमधील चार प्रमुख चित्रपटविषयक संस्था करणार आहेत. नफा मिळविणें ह्या संस्थेचा हेतु असणार नाहीं. व्यवहार पाहण्यासाठीं एक संचालक-मंडळ नेमण्यांत येणार असून त्याचें अध्यक्षपद मि. जे. आर्थर रँक ह्यांच्याकडे राहील. मि. जे रँक ह्यांच्या मालकीचीच एक संघटना मुलांची करमणूक करणारे चित्रपट आतांपर्यंत काढीत असे. परंतु ही संघटना गेल्या वर्षी बंद करण्यांत आली. ह्या कंपनीच्या प्रमुख अधिकारी मेरी फिल्ड ह्यांनींच नव्या संघटनेचीं सूत्रें आपल्या हातीं घेतलीं आहेत. मेरी फिल्ड ह्यांना ह्या प्रकारच्या कामांत बराच अनुभव आहे. यांनीं ब्रिटनमधील मुलांच्या करमणुकीच्या क्षेत्रांत बरेंच कार्यहि केलेलें आहे.

## अनुकरण करण्याजोगें जपानमध्यें काय पाहिलें ?

"जपानमध्यें २० ते २५ वर्षें वयाच्या लोकसंख्येंत पुरुषांपेक्षां स्त्रियांचाच भरणा फार मोठा आहे. कारखान्यांतील बहुतेक कामें स्त्रियाच करतात; फक्त ज्या कामास शारीरिक शक्ति मोठी लागते, अशीं कामें पुरुष करतात. सगळ्या जपानभर स्वच्छता आणि टापटीप हीं आढळतात. तेथील औद्योगिक संघटनेंत कारागीर आणि कामगार ह्यांचें चालक व दलाल ह्यांच्या इतकेंच मोठें महत्त्व आहे. हिंदी कारागिराच्या व कामगाराच्या मानानें जपानी कारागिरास व कामगारास कितीतरी ज्यास्त तांत्रिक ज्ञान असतें. तो अधिक उद्योगी असतो, ज्यास्त तास काम करतो आणि त्याला कमी वेतन मिळतें. मोठ्या, मध्यम व लहान प्रमाणावरील उद्योगांची फारच उत्कृष्ट सांगड तेथें घातलेली आहे त्यामुळें त्या सर्वांचाच फायदा होतो. प्रत्येक खेड्यांत व घरांत स्वस्त वीज उपलब्ध आहे हें जपानी माल परदेशांत परदेशी मालास टक्कर देऊं शकतो ह्याचें आणखी एक कारण आहे. जपान व भारत ह्यांतील परिस्थिति पुष्कळच भिन्न आहे. तरी पण, कितीतरी जपानी गोष्टींचें अनुकरण आपल्यास करतां येण्यासारखें आहे. शिष्टमंडळ सरकारला रिपोर्ट सादर करणार आहे, त्यांत ह्याबाबत जरूर त्या सूचना केल्या जातीलच."—जपानमधील खेडेगांवीं व लहान प्रमाणावरील उद्योगधंद्यांची संघटना आणि कार्यपद्धति ह्यांचा अभ्यास करण्यासाठी, मुंबई सरकारनें जपानला पाठविलेल्या मंडळाचे एक सदस्य, श्री. एस. के. कल्लापूर, ह्यांचें पुणें येथील को. ट्रेनिंग कॉलेजांत ता. ६ ऑगस्ट रोजीं झालेलें व्याख्यान.

---

### सीलोनमध्यें सहकारी शेतीचा प्रयोग

सीलोनच्या सरकारनें सहकारी तत्त्वावर शेती करण्यास उत्तेजन देण्याचें ठरविलें आहे. अनुराधापूर जिल्ह्यांत सहकारी शेतीचा पहिला प्रयोग करण्यांत येणार आहे. ह्या भागांतील शेती जिराईत स्वरूपाची आहे. सहकारी वसाहतींत सुमारें ८० कुटुंबें रहाणार असून त्यांना जमीन वाटून देण्यांत येणार आहे. ही सहकारी शेती वसाहत यशस्वी झाली तर सीलोनच्या इतर कोरडवाहू भागांतूनहि अशाच वसाहती करण्यांत येणार आहेत, असें समजतें. ज्या लोकांना शेतीची आवड आहे आणि ज्यांना सहकार्यानें काम करण्याची संवय आहे अशाच लोकांना वसाहतीचे नागरिक म्हणून निवडण्यांत येणार आहे. सीलोनमधील शेतकी शिक्षणाच्या ज्या शाळा आहेत, त्या शाळांमधून पास होऊन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना अगोदर संधि देण्यांत येईल. प्रत्येक कुटुंबाला १४ एकरांचा सलग तुकडा वहिवाटीसाठी देण्यांत येईल, इतकी जमीन आर्थिक दृष्टीनें स्वयंपूर्ण होईल असा अंदाज करण्यांत आला आहे. ह्या जमिनींत जें पीक येईल आणि तीवर जितकीं गुरें पोसूं शकतील, तेवढ्यावर एका कुटुंबाचा योगक्षेम चालेल. १४ एकरांपैकीं सुमारें ६ एकर जमिनींत ४ वर्षें पिकें काढण्यांत येतील; ६ एकर जमीन गुरांची जोपासना व वैरण करण्यासाठी वापरण्यांत येईल; आणि उरलेली दोन एकर जमीन रहाण्याच्या व इतर इमारती बांधण्यासाठीं राखून ठेवण्यांत येतील. प्रत्येक शेतकऱ्याला एका ठराविक प्रकारची झोपडी बांधून देण्यांत येईल. शेतीचीं अवजारें व बी-बियाणें हीं सुद्धां मोफत पुरविण्यांत येतील. त्याशिवाय सहकारी कायद्याप्रमाणें मिळूं शकणारी इतर मदतहि त्याला मिळेल. वसाहतींत जें उत्पादन होईल, त्याची विक्री सहकारी विक्री संघातर्फे करण्यांत येणार आहे. सहकारी शेतकी-वसाहतींचा हा प्रयोग सीलोन सरकारच्या शेतकी खात्यामार्फत चालविला जाणार आहे.

### अजमीर–मारवाडमधील सहकारी चळवळ

अजमीर–मारवाडच्या सरकारच्या सहकारी खात्याच्या खटपटीनें त्या राज्यांत सहकारी चळवळीची प्रगति झपाट्यानें होत आहे. सहकारी संस्थांची एकूण संख्या ९५२ असून सभासदांची संख्या ३४,००५ इतकी आहे. संस्थांचें खेळतें भांडवल सुमारें ७७·१३ लाख रुपये आहे. सहकारी संस्थांचे शेतीविषयक आणि बिगर–शेतीविषयक असे भाग पाडले, तर त्यांचें खेळतें भांडवल अनुक्रमें १३ लाख रुपये आणि ३६ लाख रुपये इतकें झालें आहे. सर्व संस्थांची मिळून ४ कोट रुपयांची उलाढाल होते. पाकिस्तानामधून निर्वासित होऊन आलेल्या नागरिकांनीं ४१ सहकारी संस्था काढल्या आहेत. त्यांची सभासद–संख्या ५०३ आहे. ह्या संस्थांना सरकारनें ३,१५,००० रुपये कर्ज म्हणून दिलें आहे. फक्त हरिजनांच्या अशा १०१ सहकारी संस्था आहेत. त्यांची सभासद संख्या २,२०९ इतकी आहे. ११८ सहकारी संस्था विविध प्रकारचीं कामें करणाऱ्या आहेत. त्यांची सभासद–संख्या ३,४९५ इतकी आहे. शेतीच्या पतपेढ्या ५४८ असून त्यांची सभासदसंख्या १२,५५४ आहे. ह्या संस्थांचें खेळतें भांडवल सुमारें ११·६८ लाख रुपये आहे. पिकांचें सरंक्षण करण्याचें काम करणाऱ्या चार खास सहकारी संस्थाहि स्थापन झाल्या आहेत. बिगर शेतीविषयक सहकारी संस्था ३१७ आहेत आणि त्यांची सभासद संख्या १६,४७७ आहे. राज्यांत ६३ सहकारी स्टोअर्स आहेत. त्यांची सभासदसंख्या ७,६०१ आहे. ह्या स्टोअर्सचा खरेदी–विक्रीचा व्यवहार ११ लाख रुपयांचा होतो.

---

**कृत्रिम दातांचा कारखाना**—प. बंगाल सरकारनें कृत्रिम दांत तयार करण्याचा एक छोटासा कारखाना काढण्याचें ठरविलें आहे. कारखान्यांत दरवर्षी २० लाख दांत तयार होतील. त्यासाठी लागणारी यंत्रसामुग्री स्वित्झरलंडहून मागविण्यांत येणार असून तिला ५ लाख रुपये किंमत द्यावी लागेल. कारखान्यांत प्रत्यक्ष उत्पादन पुढील वर्षी सुरू होईल व कृत्रिम दांत बरेच स्वस्त विकण्यांत येतील.

**पारशी धर्मोपदेशकाची उमेदवारी**—मुंबईमधील एक पारशी धर्मगुरु मि. रतनशा दोसाबा दोर्दी ह्यांनीं सिने-निर्माते मि. पॅस्कल ह्यांना असें कळविलें आहे कीं, ते काढणार असणाऱ्या गांधी–जीवनविषयक चित्रपटांत काम करण्याची आपली इच्छा आहे. मि. दोर्दी ह्यांचें गांधीजींशीं बरेंच साम्य आहे. त्यांनीं आपले फोटोहि मि. गॅब्रिएल ह्यांच्याकडे धाडले आहेत. त्यांना सिनेमाचा अनुभव नाहीं आणि इंग्रजीहि सफाईनें बोलतां येत नाहीं, असें समजतें.

**मुसोलिनीच्या मुलीची रक्कम जप्त**—मुसोलिनीच्या कन्या एडा चिआनो ह्यांच्या नांवानें अमेरिकेंतील बँकांतून ३५,००० डॉलर्स ठेवण्यांत आले होते, ते अमेरिकन सरकारनें जप्त केले आहेत. एडा चिआनो ह्यांचे पति व इटलीचे फॅसिस्ट परराष्ट्र मंत्री काउंट चिआनो ह्यांनीं आपल्या आठवणींचें पुस्तक प्रसिद्ध केलें होतें. त्या पुस्तकावरील रॉयल्टीची वरील रक्कम बँकांतून ठेवण्यांत आली होती. ह्या रकमेंतून अमेरिकन सैनिकांना अगर त्यांच्या नातेवाईकांना आतां मदत करण्यांत येणार आहे.

**संयुक्त प्रांताचा जमीनदारी फंड**—संयुक्त प्रांतांतील जमीनदारी रद्द करून जमीनदारांना नुकसान-भरपाई देण्यांत यावयाची आहे. नुकसान-भरपाईच्या फंडाची रक्कम आतां ३,२२५ लाख रुपये म्हणजे ठरलेल्या उद्दिष्टाच्या २० टक्के इतकी जमा झाली आहे.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाविलास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.